# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २०/०६/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा रिठी पारडी शिवार येथे दिनांक १९/०६/२०२२ चे ०६:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अरविंद मरवत वरखडे, वय ४० वर्ष, रा. रिठी पारडी हा शौचास रिठी पारडी येथे सागवन शिवारात जात असतांना बाजूला राहणारी शेजारीन हीने सांगितले की, तुमचा भासा हा सागवनाच्या झाडावर मृत अवस्थेत गळयात रस्सी बांधुन जमिनीवर लटकला आहे. फिर्यादी हा रिठी पारडी सागवन शिवार येथे गेला असता **विजय उर्फ मंजु अर्जुनसिंग परते (मृतक), वय २५ वर्ष, रा. रिठी पारडी वार्ड क्र. १ सावनेर** हा झाडावर कपडयाचे दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि तभाने हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा कुसुंबी येथे दि. १२/०६/२०२२ चे २४.०० वा. दरम्यान **सौ. निर्मला मनोहर लोणकर (मृतक), वय ४० वर्ष, रा. कुसुंबी सावनेर** ही आपल्या घरी बाथरुममध्ये जात असतांना तिचा तोल जावून ती खाली पडल्याने तिच्या डोक्याला मुकामार लागला. तिला उपचाराकामी प्रथम ग्रामीण रुग्णालय सावनेर नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि १३/६/२२ चे १०.४५ वा. भरती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तिला तपासुन दि. दि १७/६/२२ चे ०७.३० वा. मृत घोषित केले. पो.स्टे. सावनेर ला मर्ग चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राकेश माकडे मेडीकल पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री फुलेकर हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील डब्लुसीएल जवळ रोडवर दिनांक ११/०६/२०२२ चे १९.०० वा. सुमारास **विवेक नारायण पटले (मृतक), वय ४३ वर्ष, रा.मॉ शारदा नगर बहादुरा उमरेड** हे मित्रासोबत एमएच— ४०/सीजे— ९४८२ क्रमांकाच्या ॲक्टीव्हा मोपेडने उमरेडवरून नागपुरला परत येत असता डब्ल्यु सी एल ओवर ब्रिज संपल्यावर एक डुक्कर अचानकपणे समोर आला. त्यामुळे मृतकाने गाडीचा ब्रेक मारला रिमझिम पाउस येत असल्याने गाडी स्लीप झाली त्याला छातीला व डोक्याला तसेच मित्राला मार लागल्याने दोघेही जखमी झाले. त्यांचा प्रथमोपचार उमरेड येथे सरकारी दवाखान्यात करून नागपुर येथील यश हॉस्पीटल येथे दि. ११/६/२२ रोजी रात्री भरती केले असता उपचारादरम्यान दि. १३/०६/२०२२ चे दुपारी १२.१५ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. असे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक प्रविण पवार पो.स्टे. उमरेड यांचे रिपार्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा रामेश्वर रावते मो.क्र. ९४२०४०९४५४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर